JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

TRADE ADVISORY

Operational Update: Port Traffic Flow Normalised at JNPA Following Cargo Growth and Vessel Bunching

Navi Mumbai, 06 October 2026: Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) continues to record substantial growth in container cargo throughput across all terminals. In recent days, the port experienced a sharp surge in export cargo arrival due to simultaneous bunching of container vessels, where export cargo for more than 15 vessels arrived at the terminal gates around the same time. This concentrated movement occurred during the weekend period of Friday (02.10.2026) and Saturday (03.10.2026), leading to temporary queues and slight delays in the entry and exit of container trailers.

Taking immediate cognizance, JNPA and the terminal operators initiated timely interventions and instituted extra precautionary measures in close coordination with all stakeholders, including Container Freight Stations (CFSs) and local traffic authorities. Consequently, the congestion was effectively resolved, and traffic movement returned to normal starting Sunday morning (04.10.2026). At present, there no congestion across all terminal gates, and traffic is moving smoothly.

Key Operational Highlights & Performance Metrics:

High Vessel-Side Handling & Volume Surge: Driven by robust EXIM demand, total daily quay-side handling scaled up to 35,307 TEUs on 04 October and 32,972 TEUs on 05 October, operating significantly higher than the standard daily port average benchmark. Over 16 to 17 container vessels were simultaneously berthed and handled across terminals during peak weekend operations.

Gate Movement Variations: During peak cargo ingress on Friday (02.10.2026) and Saturday (03.10.2026), total terminal gate movements reached high volumes of 21,796 TEUs (18,391 trucks) and 20,684 TEUs (17,535 trucks) per day, respectively. Through enhanced gate automation and additional deployment, throughput stabilized to 19,294 TEUs (16,332 trucks) on 04 October and 16,972 TEUs (15,045 trucks) on 05 October, bringing overall average truck turnaround time down to a brisk 1.47 hours port-wide.

Yard Occupancy & Enhanced Evacuation: Overall yard inventory dropped from a peak of 120,173 TEUs (66.89% occupancy) on 02 October to 94,519 TEUs (52.61% occupancy) by 06 October, ensuring ample yard capacity across all terminals.

Coordinated Clearance with CFS Operators: Through proactive coordination between terminals and CFS operators for rapid import evacuation, total CFS import pendency was brought down from 22,622 TEUs on 04 October to 15,770 TEUs by the morning of 06 October, de-clogging approach lanes and sustaining seamless logistics flow.

Port operations and terminal gates continue to function seamlessly. With 24/7 real-time monitoring in place, JNPA assures all trade stakeholders and transporters that approach corridors and entry gates remain completely clear and free-flowing.

*****

About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of India's premier container-handling ports and a key gateway for the country's EXIM trade.
JNPA currently operates five container terminals — NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The port also has a shallow water berth for general cargo, operated by NSDT. Its liquid cargo facilities include a terminal managed by the BPCL-IOCL consortium and an additional liquid cargo terminal developed by JNPA and operated by M/s JSW-JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. The port's coastal berth further strengthens maritime connectivity with other Indian ports and supports the growth of coastal cargo and container movement.

Spread across 277 hectares, JNPA also operates a strategically located multi-product Special Economic Zone (SEZ) equipped with modern infrastructure and facilities to support export-oriented industries and promote trade and investment.

Looking ahead, JNPA is developing the Vadhvan Port, an all-weather, deep-draft, greenfield port in Maharashtra and the 13th Major Port of India.

For media enquiries, please contact:
Ambika Singh |Sr. Manager (Marketing), JNPA
+91 9920372677 | ambikasingh@jnport.gov.in

JN Port: www.jnport.gov.in |LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority
X: @JNPort |Instagram: @jnpaport | Facebook: @JNPA

कार्गो हाताळणीत लक्षणीय वाढ झाल्यानंतर जेएनपीएतील बंदर वाहतूक पूर्वपदावर; जहाजांची गर्दी नियंत्रणात

नवी मुंबई, 6 ऑक्टोबर 2026: जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) सर्व टर्मिनल्सवर कंटेनर कार्गो हाताळणीत सातत्याने भरीव वाढ नोंदवली आहे. गेल्या काही दिवसांत कंटेनर जहाजांची एकाच वेळी झालेली वाढती आवक आणि त्यानुषंगाने निर्यात कार्गो मोठ्या प्रमाणात टर्मिनलवर दाखल झाल्यामुळे बंदरातील वाहतुकीवर तात्पुरता ताण निर्माण झाला. एकाच कालावधीत 15 हून अधिक जहाजांसाठीचा निर्यात कार्गो टर्मिनलच्या गेटवर दाखल झाल्याने कार्गोची आवक मोठ्या प्रमाणात एकवटली. शुक्रवार (02.10.2026) आणि शनिवार (03.10.2026) या सप्ताहअखेरीच्या कालावधीत झालेल्या या एकत्रित हालचालीमुळे टर्मिनलच्या प्रवेशद्वारांवर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या आणि कंटेनर ट्रेलर्सच्या ये-जा प्रक्रियेत किरकोळ विलंब झाला.

परिस्थितीची तातडीने दखल घेत, जेएनपीए आणि संबंधित टर्मिनल ऑपरेटर्सनी सर्व भागधारकांशी, विशेषतः कंटेनर फ्रेट स्टेशन्स आणि स्थानिक वाहतूक प्राधिकरणांशी, समन्वय साधत तत्काळ उपाययोजना केल्या तसेच अतिरिक्त खबरदारीच्या उपाययोजना लागू केल्या. परिणामी, वाहतूक कोंडी प्रभावीपणे दूर करण्यात आली आणि रविवार, 04.10.2026 रोजी सकाळपासून बंदरातील वाहतूक सुरळीतपणे पूर्ववत झाली. सध्या सर्व टर्मिनल्सच्या प्रवेशद्वारांवर कोणतीही वाहतूक कोंडी नसून कंटेनर वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

प्रमुख कार्यान्वयन वैशिष्ट्ये आणि कामगिरी निर्देशक:

जहाजांमधील कंटेनर हाताळणीत वाढ आणि कार्गोच्या प्रमाणात वाढ: वाढती आयात-निर्यात मागणी आणि जहाजांच्या वाढलेल्या आवकेमुळे 04 ऑक्टोबर रोजी जेएनपीएमध्ये दररोजची समुद्रकिनारी कंटेनर हाताळणी 35,307 टीईयू , तर 05 ऑक्टोबर रोजी 32,972 टीईयू इतकी झाली. हे प्रमाण बंदराच्या नियमित दैनंदिन सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक होते. सप्ताहअखेरीच्या या कालावधीत विविध टर्मिनल्सवर 16 ते 17 कंटेनर जहाजे एकाच वेळी कार्यरत होती.

गेटवरील वाहतूक हालचालींमध्ये बदल: शुक्रवार (02.10.2026) आणि शनिवार (03.10.2026) रोजी कार्गोची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने टर्मिनलच्या गेटवर वाहनांची वर्दळ वाढली. या दोन दिवसांत अनुक्रमे 21,796 टीईयू (18,391 ट्रक) आणि 20,684 टीईयू (17,535 ट्रक) इतकी गेटवरून कार्गोची वाहतूक झाली. त्यानंतर गेट ऑटोमेशनमध्ये सुधारणा आणि अतिरिक्त मनुष्यबळ व साधनसामग्रीच्या तैनातीमुळे 04 ऑक्टोबर रोजी 19,294 टीईयू (16,332 ट्रक) आणि 05 ऑक्टोबर रोजी 16,972 टीईयू (15,045 ट्रक) इतकी वाहतूक सुरळीतपणे हाताळण्यात आली. या उपाययोजनांमुळे संपूर्ण बंदरातील ट्रकच्या सरासरी टर्नअराउंड वेळेत घट होऊन तो 1.47 तासांवर आला आहे.

यार्डमधील कार्गोचे प्रमाण घटले; अतिरिक्त क्षमता उपलब्ध: 02 ऑक्टोबर रोजी यार्डमधील कार्गोचे प्रमाण सर्वाधिक 1,20,173 टीईयू (66.89% यार्ड व्यापलेले) होते. त्यानंतर कार्गोची जलद उचल आणि निर्गमन वाढल्याने 06 ऑक्टोबरपर्यंत यार्डमधील कार्गोचे प्रमाण 94,519 टीईयू (52.61% यार्ड व्यापलेले) इतके कमी झाले आहे. त्यामुळे सर्व टर्मिनल्सवर यार्डमध्ये पुरेशी क्षमता उपलब्ध झाली असून कार्गोची हाताळणी सुरळीतपणे सुरू आहे.

सीएफएसमधील आयात कार्गोची जलद निर्गमन: आयात कार्गोची जलद निर्गमनसुनिश्चित करण्यासाठी जेएनपीएच्या टर्मिनल्स आणि सीएफएस ऑपरेटर्समध्ये सातत्याने समन्वय साधण्यात आला. परिणामी, 04 ऑक्टोबर रोजी 22,622 टीईयू असलेला सीएफएसमधील आयात कार्गोचा प्रलंबित साठा 06 ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत 15,770 टीईयू इतका कमी करण्यात आला. त्यामुळे प्रवेशमार्गांवरील वाहतुकीचा ताण कमी होऊन कार्गोची वाहतूक आणि लॉजिस्टिक्स प्रक्रिया सुरळीतपणे सुरू राहण्यास मदत झाली.

जेएनपीएतील बंदराचे कामकाज आणि सर्व टर्मिनल्सचे प्रवेशद्वार सुरळीतपणे कार्यरत आहेत. वाहतुकीवर 24x7 वास्तविक वेळेत देखरेख ठेवण्यात येत असून, बंदराकडे येणारे मार्ग तसेच टर्मिनल प्रवेशद्वारांवरील वाहतूक पूर्णपणे सुरळीत आहे. जेएनपीएने सर्व व्यापार भागधारक आणि वाहतूकदारांना आश्वस्त केले आहे की, कार्गो वाहतुकीसाठी आवश्यक मार्गांवर कोणताही अडथळा नसून वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

*****

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते आणि जेएनपीएने विकसित केलेले अतिरिक्त लिक्विड कार्गो टर्मिनल मेसर्स जेएसडब्ल्यू - जेएनपीटी लिक्विड टर्मिनल प्रा. लि. द्वारे चालवले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ट १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:

अंबिका सिंग | सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677 | ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in | लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort | इंस्टाग्राम: @jnpaport | फेसबुक: @JNPA